**'राष्ट्रीय सहकार धोरण, २०२५' च्या अनुषंगाने राज्यातील सहकार धोरणात बदल करण्याच्या दृष्टीने उच्चस्तरीय समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन आदेश क्र:-संकिर्ण ०८२५/ प्र.क्र. १९१/१८-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०८ ऑक्टोंबर, २०२५

**वाचा :-**

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शा.नि. क्र.संकीर्ण-११२३/प्र.क्र.२३५/१८-स, दि. २९.१२.२०२३.
२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि. १४/७/२०२५ रोजी झालेली राज्य शिखर समितीची बैठक.
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र दि. १२.०८.२०२५
४) मा. सचिव, सहकार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र. एम-१३०३३/४८/२०२४ दि. २८/७/२०२५

**प्रस्तावना:-**

राष्ट्रीय सहकार धोरण, २०२३ मधील शिफारशींचा अभ्यास करुन राज्याच्या दृष्टीने नवीन धोरण आखण्यासाठी शासनाच्या वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सहकार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली १७ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती. तथापि, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील दि. १४/०७/२०२५ रोजी आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष-२०२५ अंतर्गत विविध उपक्रम राबविणेबाबत राज्य शिखर समितीच्या बैठकीमध्ये विचारविनिमय करण्यात आला. सदर बैठकीत बदलत्या परिस्थितीत सहकार क्षेत्रातील आव्हाने व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करण्यासाठी तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कायदयामध्ये काळानुरुप आवश्यक ते बदल करण्यासाठी सहकार विभागाने तज्ञ समितीची नियुक्ती करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

मा. सचिव, सहकार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी त्यांच्या वाचा क्र. ४ येथील अ.शा. पत्रान्वये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना कळविले आहे की, दि. २४/०७/२०२५ रोजी सहकार मंत्रालयाने 'राष्ट्रीय सहकार धोरण, २०२५' जाहीर केले आहे. त्यानुषंगाने सहकार क्षेत्राच्या विकासासाठी राज्यांनी त्यांच्या राज्य सहकार धोरणाची आखणी जानेवारी २०२६ पूर्वी करण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात दि. ३०/०६/२०२५ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित राज्यांच्या सहकार मंत्री परिषदेत मा. केंद्रीय गृह व सहकार मंत्री यांनी देखील उल्लेख केला आहे. 'राष्ट्रीय सहकार धोरण, २०२५' नुसार राज्याचे सहकार धोरण आखण्यासाठी केंद्र शासनाने राज्यांना मार्गदर्शन व सहाय्य करण्यासाठी चार सदस्यीय तज्ञ समिती स्थापन केली आहे.

यानुसार सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी 'राष्ट्रीय सहकार धोरण, २०२५' च्या अनुषंगाने राज्याचे सहकार धोरणात अनुकूल बदल करण्याच्या दृष्टीने उच्चस्तरीय समिती गठीत करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

सहकार आयुक्त व निबंधक यांच्या प्रस्तावास अनुसरुन 'राष्ट्रीय सहकार धोरण, २०२५' च्या अनुषंगाने राज्याच्या सहकार धोरणात बदल करण्याच्या दृष्टीने मा. मंत्री (सहकार), महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश:-**

'राष्ट्रीय सहकार धोरण, २०२५' च्या अनुषंगाने राज्याचे सहकार धोरणात अनुकूल बदल करण्याच्या दृष्टीने मा. मंत्री (सहकार), महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | **अध्यक्ष** |
|---|---|
| १ | मा. मंत्री (सहकार), महाराष्ट्र राज्य |
| | **सदस्य** |
| २ | मा. राज्यमंत्री (सहकार), महाराष्ट्र राज्य |
| ३ | मा. सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (सहकार) |
| ४ | सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ५ | आयुक्त, साखर, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ६ | आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ७ | आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ८ | आयुक्त, दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| ९ | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| १० | पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| | **संस्था/संघटना** |
| ११ | श्री. सतीश मराठे, संचालक, भारतीय रिझर्व्ह बँक, सेंट्रल बोर्ड |
| १२ | श्री. व्ही.व्ही.सुधीर- संचालक, NCCT |
| १३ | श्री. सुवा कांता मोहंती-संचालक-VAMNICOM |
| १४ | श्री. मनोज कुमार-महासंचालक- LINAC |
| १५ | श्रीमती संध्या कपूर- संचालक- NCUI |
| १६ | श्री. आनंद वेंकटेशन, प्राध्यापक, IRMA |
| १७ | श्री. राहुल कांबळे, सहाय्यक प्राध्यापक, IRMA |
| १८ | श्री. विवेक जुगादे, महामंत्री, सहकार भारती |
| | **फेडरेशन/संघ** |
| १९ | श्री. विद्याधर अनास्कर, प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. |
| २० | श्री. संजय खताळ, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ |
| २१ | श्री. काकासाहेब कोयटे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन |
| २२ | श्री. सुहास पटवर्धन, अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट को-ऑप.हौसिंग सोसा. फेडरेशन |
| २३ | श्री. सिताराम राणे, अध्यक्ष, ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशन |
| २४ | श्री. चेतन नरके, संचालक, गोकुळ दूध संघ, कोल्हापूर |
| | **बँका** |
| २५ | डॉ. संतोष कोरपे, अध्यक्ष, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अकोला |

| | |
|---|---|
| २६ | श्री. दिगंबर दुर्गाडे, अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. पुणे |
| | **इतर तज्ञ** |
| २७ | श्री. मधुकर चौधरी, सेवानिवृत्त सहकार आयुक्त |
| २८ | श्री. दिनेश ओऊळकर, सेवानिवृत्त अपर आयुक्त |
| २९ | श्री. एस. बी. पाटील, सेवानिवृत्त अपर आयुक्त |
| ३० | श्री. गणेश निमकर, बँकींग तज्ञ |
| ३१ | श्री. सी. डी. काणे, निवृत्त प्राचार्य, डी.के.टी.ई. टेक्सटाईल इंजिनिअरींग कॉलेज, इचलकरंजी |
| ३२ | अपर निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) - सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने "राष्ट्रीय सहकार धोरण २०२५" मध्ये नमूद सर्व मुद्यांचा सखोल अभ्यास करून राज्याच्या सहकार विषयक धोरणात करावयाच्या सुधारणा याबाबत शासनास दोन महिन्यात अहवाल सादर करावा.

सदरचा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००८१७५३३९८४०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( संतोष पाटील )**
**अपर निबंधक तथा सह सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुबई.
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्विय सहाकय, मंत्रालय, मुंबई
७) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) वस्त्रोद्योग आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) पशुसंवर्धन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) दुग्धव्यवसाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) मत्स्यव्यवसाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) श्री. सतीश मराठे, संचालक, भारतीय रिझर्व्ह बँक, सेंट्रल बोर्ड
१५) श्री. विवेक जुगादे, महामंत्री, सहकार भारती
१६) श्री. विद्याधर अनास्कर, प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

१७)  श्री. संजय खताळ, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ
१८) श्री. काकासाहेब कोयटे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन
१९) श्री. सुहास पटवर्धन, अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट को-ऑप.हौसिंग सोसा.फेडरेशन
२०) श्री. सिताराम राणे, अध्यक्ष, ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशन
२१) श्री. चेतन नरके, संचालक, गोकुळ दूध संघ, कोल्हापूर
२२)डॉ. संतोष कोरपे, अध्यक्ष, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि
२३)श्री. दिगंबर दुर्गाडे, अध्यक्ष, पुणे जिल्हा  मध्यवर्ती सहकारी बँक लि. पुणे
२४)  श्री. गणेश निमकर, बँकींग तज्ञ
२५)  श्री. सी. डी. काणे, निवृत्त प्राचार्य, डी.के.टी.ई. टेक्सटाईल इंजिनिअरींग कॉलेज, इचलकरंजी
२६)  विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२७)  निवड नस्ती-१८-स.